सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्यांबाबतची कार्यप्रणाली आणि निकष निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक.एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५
दिनांक :- ०२.०३.२००९

**प्रस्तावना :-** सुरक्षा रक्षक मंडळात नोंदीत असलेल्या मुख्य मालकाने सुरक्षा रक्षक मंडळाकडून सुरक्षा रक्षकांची मागणी केल्यास आवश्यकतेनुसार मंडळाने मंडळाकडील नोंदीत मालकास सुरक्षा रक्षक पुरविण्याची तरतूद आहे. त्याकरिता मंडळाच्या समूच्चित यादीवर आवश्यक तेवढे सुरक्षा रक्षक उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्या बाबत दि.१९.०६.२००६ रोजी शासन निर्णय क्रमांक:एसजीए-१५२००५/(२३२/६)/कामगार-५ निर्गमित केला होता. तथापि सदर शासन निर्णयामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्याची मागणी विचारात घेऊन व इतर संबंधित बाबींचा विचार करुन शासन सुरक्षा रक्षक मंडळात सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्यासंदर्भात कार्यप्रणाली आणि निकष निश्चित करण्याबाबत काढलेला दि.१९.०६.२००६ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्यासंदर्भात भविष्यात कुठल्याही प्रकारची अस्पष्टता राहू नये याकरितां महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करुन शासन खाली नमूद केल्याप्रमाणे सुधारित आदेश देत आहे.

१) **उमेदवारांची नोंदणी :-** अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळ यांनी सर्व बाबींचा विचार करुन आवश्यक उमेदवारांची निश्चिती करावी व खालील आरक्षण व इतर निकष विचारात घेऊन निवड करावी व पात्र उमेदवारांची नोंदणी करावी.

२) **आरक्षण :-** सुरक्षा रक्षकांची नोंदणी करतेवेळी खालीलप्रमाणे आरक्षण लागू राहील.

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | - | १३ % |
| अनुसूचित जमाती | - | ७ % |
| विमुक्त जाती | - | ३ % |
| भटक्या जमाती | - | २.५ % |
| धनगर व तत्सम | - | ३.५ % |
| वंजारी | - | २ % |
| इतर मागासवर्गीय | - | १९ % |
| विशेष मागास प्रवर्ग | - | २ % |

३) **उमेदवारांची यादी खालील निकषानुसार मागवण्यात यावी :-**

मंडळाने रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडून (सेवायोजन कार्यालय) ज्येष्ठतेनुसार यादी मागवून घ्यावी तसेच सर्व प्रसार माध्यमातून (वर्तमान पत्रातील जाहिरातीद्वारे, दूरदर्शन, रेडिओ, नोटीस बोर्ड इ.) प्रसिध्दी देऊन अर्ज मागविण्यात यावेत व वरील दोन्ही प्रकारे प्राप्त होणाऱ्या याद्यांमधून/अर्जांमधून पात्र उमेदवारांची विहित पध्दतीनुसार निवड करण्यात यावी.

उमेदवाराने करावयाच्या अर्जाची किंमत रु.२०/- इतकी असेल.

.......२

४) उमेदवारांच्या शारिरीक व शैक्षणिक पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे राहतील :-

| | पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|---|
| उंची | १६२ से.मी. | १५५ से.मी. |
| वजन | ५० किलो ग्रॅम | ४८ किलो ग्रॅम |
| छाती | किमान ७९ से.मी., फुगवून ८४ से.मी. | -- |
| शिक्षण | किमान ८वी परीक्षा उत्तीर्ण | किमान ८वी परीक्षा उत्तीर्ण |
| वय | १) खुल्या गटातील उमेदवारांसाठी : १८-३३ वर्षे<br>२) मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी : १८-३८ वर्षे<br>३) परिणामीत सुरक्षा रक्षकांसाठी सदर अट लागू नाही.<br>४) माजी सैनिकांच्या बाबतीत नोंदणी वय वर्षे ४५ पर्यंत होऊ शकेल. | १) खुल्या गटातील उमेदवारांसाठी : १८-३३ वर्षे<br>२) मागासवर्गीय गटातील उमेदवारांसाठी : १८-३८ वर्षे<br>३) परिणामीत सुरक्षा रक्षकांसाठी सदर अट लागू नाही.<br>४) माजी सैनिकांच्या बाबतीत नोंदणी वय वर्षे ४५ पर्यंत होऊ शकेल. |

**५) मैदानी परीक्षा :-**

शैक्षणिक व शारिरीक निकषांची पूर्तता केलेल्या उमेदवारांची मैदानी परीक्षा एकूण ३० गुणांची घेण्यांत येईल. पुरुष उमेदवारांची किमान ४०० मीटर व महिला उमेदवारांची किमान २०० मीटर धावणे यास १२ गुण, पुढीलप्रमाणे देण्यांत येतील.

**<u>४०० मीटर धावणे (पुरुष उमेदवार) :</u>**

| | |
|---|---|
| ०१ मिनिट ३० सेकंद | १२ गुण |
| ०१ मिनिट ३५ सेकंद | १० गुण |
| ०१ मिनिट ४० सेकंद | ८ गुण |
| ०१ मिनिट ४५ सेकंद | ६ गुण |
| ०१ मिनिट ५० सेकंद | ४ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | २ गुण |

**<u>२०० मीटर धावणे (महिला उमेदवार) :</u>**

| | |
|---|---|
| ०१ मिनिट ३० सेकंद | १२ गुण |
| ०१ मिनिट ३५ सेकंद | १० गुण |
| ०१ मिनिट ४० सेकंद | ८ गुण |
| ०१ मिनिट ४५ सेकंद | ६ गुण |
| ०१ मिनिट ५० सेकंद | ४ गुण |
| ०१ मिनिट ५५ सेकंद च्या पुढे | २ गुण |

........३

तसेच हाताच्या सहाय्याने शरीर वर घेणे (PULL-UPS) एकूण ८ PULL-UPS त्याकरीतां ८ गुण व महिलांकरीतां ४ PULL-UPS साठी एकूण ८ गुण राहतील. महिला व पुरुष उमेदवारांकरीतां गुडघे न वाकविता, कंबरेपासून वरचेवर शरीर वर उचलणे (SIT-UPS) १० SIT-UPS यासाठी एकूण १० गुण राहतील.

मैदानी परीक्षेत २० गुण मिळविणे अनिवार्य राहील. सदर परीक्षेच्या प्रत्येक गटाकरिता वेगळा परीक्षक राहील. या परीक्षेत अर्हताप्राप्त उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**६) गुणवत्ता यादी :-**

ज्या उमेदवाराने मैदानी परीक्षेत २० गुण प्राप्त केले आहेत, तसेच त्याची शैक्षणिक पात्रता, तसेच त्याचा सुरक्षा कामाबाबतचा अनुभव या तिन्ही बाबींची क्रमशः सांगड घालून गुणवत्ता यादी तयार करण्यांत येईल.

तसेच उमेदवारास १० गुण हे त्याच्या शैक्षणिक पात्रतेसाठी ठेवण्यांत आले असून, त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | पास क्लास |
|---|---|---|---|
| पदवीधर | १० गुण | ९ गुण | ८ गुण |
| १२ वी पास | ७ गुण | ६ गुण | ५ गुण |
| १० वी पास | ४ गुण | ३ गुण | २ गुण |
| ८ वी पास | ८ वी पास उमेदवारास १ गुण | | |

**७) वैद्यकीय तपासणी :-**

मैदानी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व नोंदणीस पात्र झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी सुरक्षा रक्षक मंडळामार्फत करण्यात येईल. रातांधळेपणा (COLOUR BLINDNESS) असणारा उमेदवार नोंदणीस पात्र ठरणार नाही.

**८) नोंदीत सुरक्षा रक्षकांसाठी प्रशिक्षण :-**

मंडळात नोंदीत झालेल्या सुरक्षा रक्षकांना मंडळाच्या कोणत्याही नोंदीत मुख्य मालकाकडे सुपूर्द करण्यापूर्वी त्यांना किमान प्राथमिक स्वरुपाचे प्रशिक्षण देणे गरजेचे असल्याने त्यांना मंडळाच्या प्रशिक्षण केंद्रामार्फत किमान ३० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात यावे.

**९) नोंदणीसाठी पात्र उमेदवारांची यादी :-**

मुद्दा क्र. ६ मधील पात्र असलेले उमेदवार यांची आरक्षणनिहाय सूची तयार करण्यांत येऊन त्यांची नोंदणी करण्यांत येईल. तद्नंतर जे पात्र उमेदवार आरक्षणामधून शिल्लक राहतील अशा उमेदवारांची भविष्यात मंडळास आवश्यक असल्यास पुढील एक वर्षात आरक्षणनिहाय नोंदणी करण्यांत येईल.

१०) अशी भरती ज्या आस्थापनांना सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी करण्याचे मंडळाने ठरविले असेल त्या आस्थापनेसाठी ज्यांची जमीन संपादित झाली आहे. सदर प्रकल्पग्रस्त कुटूंबातील घटकांच्या पात्र उमेदवारास प्रथम प्राधान्य द्यावे. अशा उमेदवारास स्वारस्य नसल्यास, त्या संबंधित गावच्या उमेदवारास भरतीमध्ये प्राधान्य राहील. गावचा उमेदवार

........४

उपलब्ध नसल्यास, तालुक्यातील उमेदवार व तालुक्यातील नसेल तर संबंधित जिल्ह्यातील उमेदवार आणि जिल्ह्यातील उमेदवार उपलब्ध नसेल त्यावेळी त्या संबंधित महसूल विभाग व त्यापुढे राज्य पातळीवरील उमेदवार या क्रमाने भरतीमध्ये प्राधान्य द्यावे. सर्व संबंधित मंडळांनी प्रत्येक भरती प्रसंगी या नियमांचे काटेकोर पालन करावे.

११) इतर बाबतीत पात्र ठरल्यास प्रकल्पग्रस्त उमेदवारांना प्राधान्य राहील.

१२) पात्र उमेदवारांच्या यादीनुसार संबंधित उमेदवारांना नोंदित करण्यासाठी मंडळ आवश्यक ती कार्यवाही करील.

१३) हा शासन निर्णय निर्ममित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(कविता गुप्ता)
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४) सह आयुक्त कामगार (माथाडी), ताडदेव, मुंबई
५) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळ
बृहन्मुंबई व ठाणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, पुणे व रायगड.
६) संचालक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परळ, मुंबई ४०० ०१२.
७) सर्व जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त व जिल्हा कामगार अधिकारी
८) निवड नस्ती (कामगार-५)

----------